# गीत मल्हार

भा.दा.देवकाते







म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र.
REFBK-0016297
REFBK-0016297

REFBK-0016297

REFBK-0016297

ग्रं. क्र. १६२९७

# गीत मल्हार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ४९५९ वि: काव्य
क्रमांक ९८५८★ नोंद दि: २४।३।८

— मा. दा. देवकाते.

★

मूल्य : ५० पैसे

★ गीत मल्हार

© मा. दा. देवकाते

पहिली आवृत्ति

कार्तिक शुद्ध १ शके १८८९
३ नोव्हेंबर, १९६७

प्रकाशक
उ. गो. काळे,
उल्का प्रकाशन
४३१, सुखनिवास
टिळकवाडी, बेळगांव.

मुद्रक
पां. र. अंबिके,
अनसूया मुद्रणालय,
...८ सदाशिव, पेठ
...णे २.



पूज्य महाकवी
ग.दि. माडगूळकर
यांचे आशीर्वादरूपी
दोन शब्द ---

श्री. देवकाते यांची कांही गीते मी वाचली आहेत.
त्यांचे कांही गद्य लिखाणहि माझ्या वाचनात आले आहे.
मराठी भाषा आणि साहित्य या विषयींचे त्यांचे
प्रेम त्यांना यशस्वी कवी व नामवंत कथाकार
केल्यावाचून राहणार नाही.
निर्मितीचे प्रयत्न करावेसे मनःपूर्वक वाटणें हाच
माझ्यामते ईश्वरी प्रसाद आहे.
या यत्नशील तरुण साहित्यिकाला त्याच्या
इच्छित कार्यांत सुयश लाभो, असे मी
मनःपूर्वक इच्छितो

पंचवटी,
१२ फेब्रु १९६८

ग.दि. माडगूळकर

# अर्पणपत्रिका

तळहाताच्या फोडासारखं
सदा मला जपणारी
आईच्या मायेनं
पापणीतील पाणी टिपणारी
थोरली बहीण
सौ. कलावती पाटील
आणि
सागरा सारख्या
विशाल मनाचे
मेहुणे
भगवानराव पाटील
यांना--

—मा. दा. देवकाते.

# प्रकाशकाचे दोन शब्द

खंडोबा म्हणजे महाराष्ट्राचं कुलदैवत. महाराष्ट्रातील लाखोलोक खंडोबाचे भक्त आहेत. सोमवती अमावास्येला जेजुरीला यात्रा भरते. भक्तगण एकत्र येतात. वाघ्या मुरूळींची गर्दी होते. हळदीने जेजुरी पिवळी होते. कुणी नवस फेडतो. कुणी नवस बोलतो. बेलभंडारा उधळून भाविक देवाचं दर्शन घेतात.

दसऱ्यालाही बरेंच भक्तगण जेजुरीला येतात. पालखी निघते. ' येळकोट मल्हार ! जय मल्हार 'च्या घोषणा देत लोक नाचत असतात.

खंडोबाची अवतारकथा मनोरंजक आहे. मणि— मल्ल नावाचे राक्षस लोकांचा छळ करूं लागले. त्या राक्षसांनी सप्तर्षींचा तपोभंग केला. सप्तर्षी शंकराकडे गेले. भगवान शंकराने खंडोबाचा अवतार घेऊन दैत्याचा वध केला. शंकरा प्रमाणे खंडोबाला बेल प्रिय आहे. जेजुरीच्या गडावर नंदीहि आहे. हातात खड्ग असल्याने भक्त मल्हारीला खंडेराव म्हणतात.

खंडोबानं मल्ल राक्षसाचा वध केल्याने देवाला मल्हारी या नांवानं ओळखलं जातं. मणिराक्षसानं पांढऱ्या घोड्याच्या रूपानं देवा जवळ वास्तव्य केलं आहे.

म्हाळसामाई आणि बाणाई या खंडोबाच्या बायका. या दोन बायकांच्या दादल्याच्या फजिती विषयी बऱ्यांच ऐकीव कथा ऐकायला मिळतात. हेगडे प्रधान खंडोबाचा कारभारी.

महाराष्ट्राचे इतिहासात खंडोबाला फारच महत्व आहे. संत तुकारामाच्या अभंगात खंडोबाचं वर्णन आढळतं. श्री एकनाथ महाराजांनी खंडोबाचा उल्लेख आपल्या गीतांतून केला आहे.

शहाजी महाराजांनी शिवबाचीभेट जेजुरीच्या गडावर घेतली. बापलेकोंची भेट मल्हारी समोर झाली. त्याचप्रमाणे शाहू महाराज, तुकोजी होळकर जेजूरीला येऊन गेल्याचं आढळतं...उमाजी नाईक खंडोबाभक्त होता.

जेजुरीचा खंडोबा होळकरांचं दैवत असल्याने मल्हारराव होळकर, अहल्यादेवी होळकर यांनी देवस्थानासाठीं बराच खर्च केला आहे. जेजूरीला होळकरांचा तलाव प्रसिद्ध आहे.

जेजुरीच्या गडावर खंडोबाचं वास्तव्य असलं तरी मूळ स्थान जवळच कपडेपठारावर आहे. भाविक लोक दोन्ही ठिकाणी जावून दर्शन घेतात.

कुलदेवतेच्या दर्शनासाठीं लग्नानंतर थोडयाच दिवसात नवविवाहित जेजुरीला येतात. खंडोबाचे भक्तदेवाचं जागरण घालतात. तळी उचलतात ...

वाघ्यामुरळीचा नाच होतो. वाघ्या टिमकी वाजवितो .. मुरळी घाटी बाजवून नाचत असते.

खंडोबाच्या भक्तगणात बहुजन समाजाचा भरणा आहे....ग्रामिण लोकांत खंडोबाभक्ती आढळते. खंडोबाची माहिती देणारी छोटी मोठी पुस्तकं मराठीत असली तरी अगदी गांवाकडच्या लोकांना समजेल अशी रचना हवी होती.

माझे मित्र श्री. मा दा. देवकाते यांनी गीत मल्हार लिहितांना सर्वांना समजेल अशी सोपी भाषा वापरली आहे. तळी उचलायचं गीत, जागरणाचं गाणं, खंडोबाची आरती, खंडोबाची अवतार कथा आणि इतर गाणी लोकांना आवडतील अशी खात्री वाटते.

——प्रकाशक

# तळी उचलणे

मल्हारी, मार्तंड भैरव भोळा
तळी भरण्याचा हा विधि निराळा
सदानंदाचा येळकोट बोला
जावून येवूया जेजुरीला

पानं, सुपारी, पैसा खोबरं
ताम्हणांत ठेवून पिवळा भंडार
येळकोट येळकोट देव मल्हारी
इच्छा मनीची कर माझ्या पुरी

निवद देवाला दावितो साधा
वांग्याचं भरीत, पातीचा कांदा
ठोंबरा, रोडगा आणि लसूण
स्वीकार करीतो देव हसून

लावून दिवटी करतो आरती
जयदेव जयदेव जय म्हाळसापती
चार पावलं वाट चालतो
जेजुरीला मी जावून येतो

विझविल्यावर दुधानं दिवटी
देवाच्या नावानं वाजवितो घाटी
तळी भरण्याचा विधि हा झाला
सदानंदाचा येळकोट बोला

# आरती

जयदेव जयदेव मार्तंड भैरव
मल्हारी माझ्या नवसाला पाव ।। धृ ।।

खडगं, डमरुं, हाती त्रिशूळ
बानूला देवाची पडली भूल
जवळ बसली म्हाळसामाई
वाघ्या मुरळीची चालली घाई
पांढरा घोडा देवाचं वहान
पायाशी बसलं एक काळं स्वान
येंळकोट, येंळकोट मार्तंड भैरवा
गरीब भक्ताच्या नवसाला पावा ।। १ ।।

मणिचूल नांवाच्या पर्वतावर
सप्तर्षींचा आश्रम सुंदर
दैत्य मल्लासूर आश्रमी गेला
सप्तर्षींचा छळ त्याने केला
मणि मल्ल दानव मातलें फार
म्हणून शिवानं घेतला अवतार
येळकोट येळकोट देव मल्हारी
हळदीनं पिवळी झाली जेजुरी ।। २ ।।

खंडोबा, मल्हारी देवाचं नांव
समोर आहे मोठं कासव
सोमवारी जेंव्हा अमावास्य येतें
जेजुरीला मोठी यात्रा भरते
लांब लांबून भाविक येती
नवलाख पायऱ्या चढून जाती
येळकोट येळकोट देवा मार्तंडा
पुढे मुरळ्यांचा नाचतो तांडा ॥ ३ ॥

# जागरण

जेजुरींच्या खंडेराया
जागरणाला यावं
दोन घांस घेण्यासाठीं
पंक्तीला बसावं

जेजुरीच्या भैरवा
जागरणाला यावं
बरोबर घोड्यावर
म्हाळसेला आणावं

या हो या जागरणाला
घेवून या बाणाईला
जेजुरीच्या खंडेराया
या हो या जागरणाला

देवाच्या मनाचा
ठाव नाहीं घावत
धनगराची बानू झाली
म्हाळसेची सवत

खळं आता सरलया
सोनं रानी पिकलया
जेजुरीच्या खंडोबाचं
जागरण मी घातलया।

जेजुरीच्या खंडेराया
जागरणाला यावं
हेगडे प्रधानाला
संगती आणावं

जेजुरीच्या खंडेराया
जागरणाला यावं
आडाणी भक्ताच्या या
नवसाला पावावं

रातभर जागरणांत
जळतीया ही उंडी
वाघ्या ओढतोय कसा
लंगर लोखंडी

अनुक्रम ... दि:

धाकट्या लेकीचं
होवू दे लगीन
सोमवारी अवसेला
जेजुरी बघीन

कारभारीन सारखी
पडतींया आजारी
दवा पाणी करून मी
झालो कर्ज बाजारी

जागरणाला येताना
दवा तू घेवून ये
देवा माझ्या बायकुला
गुण आता पडू दे

थोरल्या सूनेचं
पोट यंदा पिकू दे
मरण्याआधी डोळ्यांनी या
नातू मला बघू दे

जेजुरीच्या खंडेराया
जागरणाला यावं
अडाणी भक्ताच्या या
नवसाला पावावं

धाकटं कारटं
गैराटं निघालं
जेजुरीच्या देवा तुम्ही
त्याच्या कडे बघालं

काळ्या काळ्या रानामंधी
सुगी यंदा पिकलिया
खंडीभर जवार मी
बाजारात विकलिया

घ्यायची यंदा नवी गाडी
कोशी खिलारी बैलजोडी
कारभारनीला आणायची
जरीची एक साडी

माळवं बाजारी विकिनं
नवी गाडी जुपिनं
जेजुरीला मी येईन
नवस देवा फेडिनं

जेजुरीच्या खंडेराया
जागरणाला यावं
आडाणी भक्ताच्या या
नवसाला पावावं

या हो या जाग्रणाला
घेवून या बाणाईला
जजुरीच्या खंडेराया
या हो या जागरणाला

थंडगार वारं सुटलया
तांबडं नुकतय फुटलया
लंगर वाघ्यान तोडला
खंडोबा जागरणाला आला

✦ ✦ ✦

# मल्हारीची कथा

कृतयुगी मणिचूल पर्वतावर
होता सप्तर्षींचा आश्रम सुंदर
स्थान शांत होत फार
चाले ऋषीचं तप घनघोर

मणिमल्ल दैत्य तिथे गेले
त्याने तपोवन उध्वस्त केले
आश्रम ऋषीचे नष्ट झाले
गरीब गाईना ठार मारले

सप्तर्षी शोकाकुल झाले
इन्द्रदेवाच्या भेटीला गेले
हाल सांगीतले इन्द्रदेवाला
तुम्ही चला आमुच्या रक्षणाला

इन्द्र वदला येवून काय करुं
मणि मल्लाला कसं मी मारुं
त्यांनी तपश्चर्या केली घोर
ब्रह्मदेवानं, दिला त्यांना वर

त्यांना हरवेल करु कोणी
अजय आहेत मल्ल आणि मणि
तुम्ही जावा विष्णूदेवाकडे
तक्रार मांडा त्यांचे पुढे

ऋषि विष्णूदेवाकडे गेले
सारे हाल सांगू लागले
विष्णू म्हणाले मी काय करुं ?
अजय दैत्यांना कस मी मारुं ?

ऋषिजन शिवाकडे गेले
दैत्यांचे छळाचे वृत्त बोलले
मातले आहेत फार दानव
झाले छळाने व्याकुळ मानव

ऐकताच राग शिवाला आला
त्वेषाने जटा तो आपटू लागला
जटा आपटता नामक धृतमारी
जन्मा आली विक्राळ महामारी

ऋषीने तिला तूप पाजले
आराधना करून शांत केले
मणि–मल्लाचा करण्या संहार
भोळ्या शिवान घेतला अवतार

मुकुटावरती दिसे चंद्रकोर
कपाळावरती लावला भंडार
गळ्यात महासर्प खेळू लागती
कानात मार्तंड कुंडले हालती

लढाया निघाले सप्त कोटी गण
शंकराचे गात होते गुणगान
बसला नंदीवर कैलासपति
कार्तिक स्वामी झाले सेनापती

घनघोर युद्ध सुरु झाले
सैन्य दोन्ही लढू लागले
होवू लागला शस्त्र खणखणाट
वाहू लागले रक्ताचे पाट

देव त्वेषाने लागले लढू
राक्षसांची फळी लागली पडू
मणि दैत्य फार अस्वस्थ झाला
रागानं भैरवावर चालून आला

मार्तंड भैरव रागावला खूप
मणि घेवू लागे मायावी रुप
मग शिवान त्रिशूळ काढला
मणि दैत्याला धरणीवर पाडला

मणि दैत्यान केली शिवस्तुती
प्रसन्न झाला कैलासपती
शांत होता शिव शंकर
मणि दैत्यान मागितला वर

देवा मला अश्व रूप दे
जवळ सदा ठेवून घे
भोळ्या देवाला दया लगी आली
त्यांची विनंती मान्य की झाली

महाल ... १९६२९.६ ... स्थळ

आणि दैत्य पांढरा घोडा की झाला
भैरवा जवळ राहू लागला
त्यान भावाला उपदेश केला
परंतु सारा व्यर्थच गेला

उरले सुरले सैन्य घेवून
दैत्य मल्लासूर आला चालून
धूतमारी महामारी तेव्हां पुढे गेली
मल्लासुरा बरोबर लढू लागली

मल्लासूराचा आवेग पाहून
मार्तंड भैरव गेला की धावून
राग देवाला आला होता फार
खडगाने त्यानें करता वार

मल्लासूराचा जवळ आला काळ
केल देवान त्याला घायाळ
मल्लासूर स्तुतिकरता झाला
त्यान मागीतला वर देवाला

भैरवा माझ्या नवसाला पाव
तुझ्या नावा आधी याव माझं नाव
देव नवसाला त्याच्या पावला
भैरवाचा देव मल्हारी झाला

# म्हाळसा माई

नेवासे गावी वाण्याच्या घरी
जन्मा आली एक सुंदरी
तिचं रूप होतं देखण फार
डोळे होते काळेभोर पाणीदार

तिचा रंग होता गोरा गोरा
फिक्या पडती रंभा अप्सरा
वयान आली अवखळ पोर
लागला बापाच्यां जीवाला घोर

एकदा देवांला म्हाळसा दिसली
तिच्या नजरेची नागीन दसली
देवाला पाहून म्हाळसा फसली
आणि गालांमधी खुदकन हासली

देव मनामधी व्याकूळ झाले
आणि तिच्यापुढे उभे ठाकले
कातविग रंगला विडा
भैरव झाला तिच्यासाठी वेडा

भूल पडली म्हाळसामाईला
मनी वरलं तिनं देवाला
भाग्य तिचं उदयाला आले
देवासंग लग्न लागलं

बसून आली पांढऱ्या घोड्यावर
तिनं पाहिल आपलं सासर
येऊन जेजुरीच्या गडावर
पाहू लागली सगळा कारभार

✦ ✦ ✦

# बाणाई माई बाणाई

बाणाई माई बाणाई ग
बाणाई माई बाणाई
इंद्राला होत्या सात लेकी
बाणाई एक त्या पैकी
बाणाई माई बाणाई

सात लेकीकडे पाहून
विचारलं इंद्र देवान
तुम्ही कुणावर अवलंबून !
बाणाई माई बाणाई

तुमच्यावर वदल्या सहाजणी
परंतु बोलली बानू त्याक्षणी
माझ्यावर मी अवलंबुनी
बाणाई माई बाणाई

राग आला इंत्रदेवाला
शाप दिला त्यानं बानूला
लगे तिथे चमत्कार झाला
बाणाई माई बाणाई

बानु बनली लहानस मुलं
चंदनाच्या पेटीत घातलं
चंदनपुरच्या जंगलात सोडलं

बाणाई माई बाणाई

मेंढ्या राखत आला धनगर
त्याची पेटीवर पडे नजर
आत होतं बाळ सुंदर

बाणाइ माई बाणा ई

सांभाळू लागला तिला धनगर
बानू होवू लागली थोर
पूजू लागली शिवशंकर

बाणाई माई बाणाई

भोळे शंकर प्रसन्न झाले
अद्‌भूत खडावा देवून गेले
आश्चर्य बानूला वाटले

बाणाई माई बाणाई

खडावा घालता विपरीत झाले
देव मल्हारी तिच्यापुढे आले
रोखून रोखून पाहू लागले

बाणाई माई बाणाई

बाणून चोरून पाहिलं
रूप देवाचं मनात राहिलं
काजळान पत्र लिहिलं

बाणाई माई बाणाई

पत्र मिळाल खंडोबाला
देव वाचून वेडा झाला
भूलला बानूच्या रूपाला

बाणाई माई बाणाई

सारी पाटाचा डाव रंगला
देव वदले म्हाळसा माईला
हे रेल तो जाईल वनवासाला

बाणाई माई बाणाई

मल्हारीनं विचार जरा केला
मनामध्यें बेत आखला
सारी पाटीचा डाव हारला

बाणाई माई बाणाई

देव निघाले वनवासाला
बारा वर्षाचा वियोग आला
वाईट वाटले म्हाळसा माईला

बाणाई माई बाणाई

भूलेश्वर मल्हरीचा गुरु
देव म्हटले काय मी करुं ?
माझ्या मनाला कस आवरुं ?

बाणाई माई बाणाई

भूलेश्वरान आदेश दिला
देव मल्हारी धनगर झाला
चंदनपुरी येवून राहिला

बाणाई माई बाणाई

देव बानूच्या कळपात गेला
शेळ्या मेंढ्या राखू लागला
रानोमाळी हिंडू लागला

बाणाई माई बाणाई

सातशे शेळ्या एकत्र करून
सातशे मेंढ्या नदीकाठी नेवून
मग देवान टाकल्या सोलून

बाणाई माई बाणाई

शेळ्या मेंढ्यांचा चेंदा मेंदा झाला
धनगर मनात घाबरून गेला
तवा भैरव बोलता झाला

बाणाई माई बाणाई

शेळ्या मेंढ्या जीवंत करतो
एक गोष्ट तुम्हा सांगतो
फक्त बानूचा हात मागतो

बाणाई माई बाणाई

धनगरानं अट मान्य केली
सारी मेंढरं जीवंत की झाली
रानोमाळी हिंडू लागली

बाणाई माई बाणाई

त्यानं बानूला घोड्यावर घातलं
तिच्या डोळ्यात पाणी दाटलं
तवा देवानं खरं रूप घेतलं

बाणाई माई बाणाई

ओळख पटली त्यांना देवाची
कळी खुलली वेड्या बानूची
झाली तयारी मग लग्नाची

बाणाई माई बाणाई

# नाव माझं बानू

नका वेडी म्हणू
नाव माझं बानू
आहे मी लेक धनगराची
झाले बाई राणी मल्हारीची ।। धृ ।।
मला पाहून देव वेडा झाला
हिंडू लागला राना माळाला
येवू लागला भेटीला एकला
त्यानं मेंढयांचा कळप राखला
रोज होई भेट भैरवाची ।। १ ।।
डाव प्रेमाचा रंगांत सरला
ज्वर मदनाचा अंगात भरला
आण लग्नाची दोघात घेतली
मल्हारीन भुरळ मला घातली
राणी मी झाले मार्तंडाची ।। २ ।।
प्रीत आमची बहरून आली
मुकी मेंढरं बुजु लागली
झाडा झुडपांना गुपित कळलं
रानपाखरूं माळावरलं चळलं
वाट आम्ही धरली जेजुरीची ।। ३ ।।

# सासर सासर ग

(पंचमीचं पाणं)

सासर सासरग जेजुरी सासर
आकरीत आकरीत
घडलया आकरीत
निराळीच गोडी बाई
भैरवाच्या प्रीतीत
सासर सासर ग जेजुरी सासर
सरीत सरीत
रानामंदी सरीन
देवासंग खाल्ल मी
वांग्याच भरीत
सासर सासर ग जेजुरी सासर
मेंढर मेंढर
राखते मी मेंढर
हसता मी पडतया
चांदण पांढर
सासर सासर ग जेजुरी सासर
वंगाळ वंगाळ
म्हाळसा लई वंगाळ
भलताच माझ्यावर
घेतीया कशी आळ
सासर सासर ग जेजुरी सासर

...३

म्हणतीया म्हणतीया
देवाला मी भूलले
भूलून मल्हारीच्या
मागोमाग आले
सासर सासर ग जेजुरी
देवान माझ्या घरी
केलीया चाकरी
आवडीन खाल्ली
कांद्या संग भाकरी
सासर सासर ग जेजुरी सासर
देवान मला पाहिलं
भान नाही त्याला राहिलं
मल्हारीन माझ्यासाठी
मागण घातलं
सासर सासर ग जेजुरी सासर

✦ ✦ ✦

# देवा मल्हारी ये धांवत

लांब लांबक्या लागल्यात शेंगा
बाभळीच्या झाडाला
राखीत राखीत येईन तिकडे
मेंढराच्या कळपाला

ओढयाच्या काठी डाव्या बाजूला
निवडुंगाचं बेट पहा
चिंचा लागलेल्या झाडाखाली
तिथेच तू उभा रहा

निवडुंगाची बोंडं झाडूं
कोवळे कोवळे आकडे पाडूं

काळया रानाला पडल्या भेगा
विहीरीच्च पाणी आटलं
आवरुं कशी मीं पदराला
जोराचं वार सुटलं

जोराचं उनाडवार संगती
घेवून आल ढगाला
थेंब टपोरे पडू लागले
सुरवात झाली मिरगाला

वगळीला पाणी आलं
भिती अंग शहारलं
जावू कशी मी घरी आता
मन माझं तर घाबरलं

आभाळ होतं गळत
मेंढर होती पळत
बिजली होती चमकत
वारा होता घोंगावत

भिजून गेले पावसात
गारठा भरला अंगात
उभा नाही मला रहावत
देवा मल्हारी ये धावत

✦ ✦ ✦

# दोन बायकाचा देवबाई नवरा

झोक जाईल कुणी त्याला आवरा
दोन बायकाचा देव बाई नवरा ॥ धृ ॥

म्हाळसा म्हणे माझा खंडेराव
बानू म्हणते माझा भैरव

देव ऐकून झाला बावरा ॥ १ ॥

दोघी जणी भाडभांडती
त्यांना समजावावं तरी किती

मार्तंड म्हणे कुणी त्यांना आवरा ॥२॥

देव लाड करती बानूचे
म्हाळसामाई थयाथया नाचे

तिच्या पायात फिरतुया भवरा ॥३॥

# देव बानूच्या प्रेमाला सोकला

तिनं रागान ढेकुळ टाकला
देव बानूच्या प्रेमाला सोकला ।। धृ ।।

बानू खंड्याची जमली ज़ोड
देवाला लागल खरोखर वेड

रानोमाळी हिंडून थकला ।। १ ।।

देव झाला बानूचा चाकर
खावू लागला शिळी भाकर

त्यानं मेंढ्याचा कळप राखला ।। २ ।।

गावकऱ्यांना गुपीत घावलं
त्यांनी दोघाच लगीन लावलं

गावसारा भंडाऱ्यान माखला ।। ३ ।।

✦ ✦ ✦

# खंडोबा माझ्या नवसाला पाव

जीवन म्हणजे जुगार देवा
मीहि टाकते डाव
मल्हारी माझ्या नवसाला पावरं
खंडोबा माझ्या नवसाला पाव ।। धृ ।।

जीवन माझे पणी लावले
सुख न जगती मला घावले
क्षणा क्षणाला सोसीत गेले
दु:खाचे मी घाव ।।१।।

नाहीं मिळाली मला सफलता
गुंजारव सदा करी विफलता
जगणे किंवा मरणे आता
धाव खंडोबा धाव ।। २ ।।

सांज सकाळी करीन आरती
इच्छा मनीची कर तू पुरती
सदा असतया ओठावरती
मल्हारी तुझच नाव ।। ३ ।।

# नवसाला पावल मल्हारी

नकोस दडवू मनी यातना
पाहून ये तू जेजुरी
तुझ्या नवसाला पावल मल्हारी ॥ धृ ॥

किती वर्णन सांगु तुला
यात्रा भरते सोमवतीला
गरीबाचा देव कैवारी ॥१॥

लांब लांबून भक्तगण येती
बेल भंडारा उधळुन जाती
सुख नांहतय त्यांचे घरी ॥ २ ॥

बघ मुरळ्यांचीही प्रीती
देवा पुढे नाचनाचती
साडी लेवून नववारी ॥ ३ ॥

येळकोट म्हणून थकला वाग्या
नाच नाचून थकला भोग्या
घाली देवाला ललकारी ॥४॥

# आज मी मल्हारी पाहिला

येळ कोट म्हणूनी बेलभंडारा
पिंडीवर वाहिला
आज मी मल्हारी पाहिला ॥ धृ ॥

पाहिली देवाची जेजुरी
चढले नवलाख पायरी
उधळून भंडारा गडावरी

बेल पिंडीवर वाहिला ॥ १ ॥

भैरवाचं मी दर्शन घेता
म्हाळसा माईला पूजता
माई बाणाईचा आता

राग माझ्यावर राहिला ॥ २ ॥

# मुरळी मी देवाची

बेल भंडारा उधळून वहाते
फुल भक्ती भावाची
मुरळी मी देवाची हो
मुरळी मी देवाची ।। धृ ।।

मला मिळालं सासर चांगलं
माझ देवाशी लग्गीन लागलं
घरदार मी की हो सोडलं
गणगोताशी नातं तोडलं
पूजा करते खंडेरावाची ।। १।।

हिंडते म्हणत देवाची गाणी
बारा गावच प्याले मी पाणी
मला म्हणतात नखरेल कोणी
कुणी म्हणती जेजूरीची राणी
आहे मीं पुण्याकडल्या गावाची ।। २ ।।

अैतवारी गावामधी हिंडतें
वाजवत घाटी नाचनाचते
सोमतीला जेंजुरीला जाते
येळकोट म्हणून स्तुती करते
देव भैरवाच्या नावाची ।।३ ।।

✦ ✦ ✦

# हातात घाटी, भंडारा ताटी

हातात घाटी भंडारा ताटी
मुखी मल्हारी नाव
तन मन देवा तुला वाहिलं
सोडून आले गाव ।। धृ ।।

नवलाख पायरी चढले
मंदीरी तुझ्या मी आले
दर्शनें गुंग जाहले
नाही भान मला राहिले
खंडोबा माझ्या नवसाला पाव ।। १ ।।

पांढऱ्या शुभ्र घोड्यावरी
बसली भैरवाची स्वारी
मणि–मल्ल मातले भारी
देव निघाले की संहारी

खंडोबा माझ्या नवसाला पाव ।। २ ।।

✦ ✦ ✦

# अंदा जायचय जेजुरीला

धोंडया कोंडयाची खिलारी जोडी
जुपुन नव्या कोऱ्या गाडीला
अंदा जायचय जेजुरीला
ग बाई जेजुरीला ।। धृ ।।

धनी माझा नवस की हो बोलला
माझ्या घरात पाळणा हालला
आनंद झालाय दादल्याला ।। १ ।।

यंदा पावसाची किरपा झाली
रानी तरारून जवार आली
ताट आलीत पोटऱ्याला ।। २ ।।

गेली निसवून जवार सारी
पाखर छळाया लागली भारी
रान आलय हुरडयाला ।। ३ ।।

बघता बघता खळ सुरुं झाल
पिक मोत्याचं हाती बाई आलं
फेडाया जायचय नवसाला ।। ४ ।।

◆ ◆ ◆

# स्वारी शिवबाची जेजुरीला आली

## (पोवाडा)

स्वारी शिवबाची ज़ेजुरीला आली
बाप लेकाची भेट इंथे झाली ॥ धृ ॥

मोगलाचा जाच पाहून
बाल शिवाजी उठले पेटून

नव्हता मराठ्यांना कुणी वाली
चार तरणी पोर गोळा झाली

त्यानी केलं भवानीचं स्मरण
शीवनेरीवर बांधल तोरण

हिंडू लागले कपारी कडा
गनीम युद्धाचा घेतला धडा

घेवू लागले गडावर गड
करता शत्रूने गडबड
ठाण्या मागून ठाणी घेतली ॥ १ ॥

भरला मोगलांचा दरबार
शहाजी राजे तिथं सरदार

गडबड करतो तुमचा पोर
त्रास देतो वरचेवर

जावा तुम्हीच समज घाला
उपदेशाचे चार शब्द बोला

समजावा आपल्या पोराला
नाहीतर त्रास होईल तुम्हाला

बघायला शिवबाला
त्यांनी जेजुरी पाहिली ॥ २ ॥

गडावर गोसावी मोरया
त्यानं केली एक अशी किमया

शिवबाला बोलावलं जेजुरीला
निरोप धाडला शहाजी राजाला

बऱ्याच दिवसात पडता गाठ
देवासमोर व्हावी भेट

अशी काढली त्यान आडवाट
केली व्यवस्था सारी निट

होणार म्हणून वडीलांची भेट
रुबाबात चालत ऐटीत
स्वारी शिवबाचीं जेजुरीला आली ॥३॥

ग्रंथ संग्रहालय ठाणे
९६२९७
ग्रं. क्र.
ग्रंथ शाखा

बाप लेक भेटले गडावरी
साक्षी होते देव मल्हारी

शहाजीनं सांगीतलं शिवबाला
वागू नकोस असं तू मुला

त्रास होईल उगीचच मला
तेव्हां शिवाजी बोलता झाला

विचार पटलाय जिजामाईला
आपलं राज्य स्थापायचं मला


साक्षी ठेवून खंडोबाला
बेल भंडारा आम्ही उचलला

देव मल्हारी आमचा वाली ॥ ४ ॥

✦ ✦ ✦

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ४११४ २
९०४६
२४।३।९५

REFBK-0016297
REFBK-0016297


गीता फिल्मस्
देवा तुझी
सोन्याची जेजुरी
निर्माता:
राम गवाले
दिग्दर्शक: राजा बारगीर.
संगीत: राम कदम.
व्यंकटेश माडगूळकर.